# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक : तंशिसं/विकाना/ईबीसी/मुल्यां.दर्जा/2017/ 1576

दिनांक : 15 JUN 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून पुढे सुरु ठेवण्याबाबत.**

**संदर्भ :-** 1) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. 18/ईबीसी/मुल्यां.व दर्जा माना/ 2017-18/77, दि. 05.06.2017.

2) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्रा क्र. टीईएम-2015/प्र.क्र.2019/ तांशि-4, दि. 31.03.2016

3) उ.व तं.शि.विभागाचे शासन पत्र क्र. टीईएम-2015/प्र.क्र.219/तांशि-4, दि. 30.05.2017.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, सोबत संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्र. 1 यासोबत जोडण्यांत येत आहे. संदर्भिय पत्रात नमूद केल्यानुसार संस्थेनी शैक्षणिक वर्ष 2018-19 पर्यंत मुल्यांकन व दर्जा मानांकन व दर्जा निश्चिती करण्याबाबत योग्य ती कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यांत यावा.

**सहपत्र : वरीलप्रमाणे**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत : 1) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई (का.क्र.18) यांना संदर्भिय पत्रान्वये मानार्थ सादर.

2) प्रोग्रामर,तंशिविका.नागपूर. सदरहू पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई - 400 001.

दुरध्वनी : 022-22617969 फॅक्स : 022-22690007

E Mail : desk18@dtemaharashtra.gov.in Website : dtemaharashtra.gov.in


रजि. एडी/ई-मेलव्दारे

क्रमांक : १८/ईबीसी/मुल्यां. व दर्जा माना./२०१७-१८/७७

दिनांक : ०५/०६/२०१७

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

**मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर,**

विषय: खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२०१९/तांशि-४, दि. ३१.०३.२०१६

२) उ. व तं. शि. विभागाचे शासन पत्र क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३०.०५.२०१७

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयातील अट क्रमांक १८ खालीलप्रमाणे आहे :-

" सदर योजनेंतर्गत पात्र असणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे (Assesment Accreditation ) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थाकडून मुल्यांकन व दर्जा निश्चिती करून मुल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विसक्षार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहिल."

वरील अटीनुसार सर्व संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक संस्थांनी सक्षम शिखर संस्थांकडून मुल्यांकन व दर्जाचे मानांकन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत प्राप्त करून घेणे गरजेचे आहे, अन्यथा या संस्था शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून उपरोक्त शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहतील. आता लवकरच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ सुरू होत आहे. त्यामुळे हया शैक्षणिक संस्थांना मुल्यांकन करून घेणेसाठी २ वर्षाचा कालावधी शिल्लक राहणार आहे. या २ वर्षाच्या कालावधीत हया शिक्षण संस्थांनी मुल्यांकन करून घेणे गरजेचे आहे. याची जाणीव आपण तातडीने सर्व संबंधित शिक्षण संस्थांना करून द्यावी. जेणेकरून, त्या संस्थांमध्ये शिकणाऱ्या सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सदर शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीच्या लाभापासून वंचित ठेवता येणार नाही. सबब आपण योग्य ती कार्यवाही त्वरेने करावी व त्याप्रमाणे आपल्या नियंत्रणाखालील सर्व संस्थांना सूचना निर्गमित कराव्यात व याबाबत या संचालनालयास अवगत करावे.

(चंद्रशेखर ओक) भा. प्र.से.

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

4258

13 JUN 2017

प्रत : डॉ. किरण पाटील, उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, यांना माहितीस्तव सादर.